# शिक्षणाचे जादुभरे बेट

डॉ. अभय बंग

नई तालीम विद्यालयातील विद्यार्थीदशेच्या या हूरहूर लावणाऱ्या आठवणींमधून त्या शिक्षणपध्दतीचे चित्र डोळ्यांपुढे अुभे राहते.

मी लहानपणी जशा शाळेत शिकलो तशी शाळा, तशी शैक्षणिक संधी माझ्या मुलाला - आनंदला - मी आता देअू शकत नाही ही माझी अेक मोठी खंत आहे. आमच्या लहानपणची गोष्टच और होती, आता तसलं काही राहिलं नाही!" अशी कुरकर हे म्हाताऱ्या मनाचं लक्षण आहे हे माहित असूनही मी खंत व्यक्त करतो. असं खरंच माझ्या शाळेत काय होतं ?

माझं ९ वी पर्यंतचं शिक्षण गांधीजींच्या नई तालीम शिक्षण पध्दतीत झालं. त्यातही चार वर्षे तर मी प्रत्यक्ष सेवाग्राम आश्रमातील नई तालीम विद्यालयात शिकलो. शिक्षण म्हणजे निसर्गापासून तोडून चार भिंतींच्या आत बसून देण्याचा रटाळ धडा नाही तर निसर्गासोबत राहून समाजोपयोगी भूमिका करतांना प्राप्त होणारा संस्कार, बुध्दीचा विकास व कौशल्य आहे हा गांधीजी-प्रणीत नई तालीम शिक्षण - पध्दतीचा मुख्य विश्वास, या कल्पनेनुसार नवी शिक्षणपध्दती विकसित करण्यासाठी गांधीजींच्या मागणीवरुन रवींद्रनाथ टागोरांनी शांतिनिकेतनमधून श्री. बार्यनायकम् व श्रीमती आशादेवी या सहिली - बंगाली जोडप्याला पाठवलं. त्यामुळे गांधीजींच्या शिक्षणपध्दतीला रवींद्रनाथांच्या निसर्ग व कलाप्रेमाची जोड मिळाली. त्यांनी ही शाळा सुरु केली. माझे आई-वडीलही या प्रयोगात सामील झाले. या शाळेतील शिक्षण-पध्दती किती वेगळी होती याची अुदाहरणे सांगतो.

## प्राण्यांची ओळख

वने व वन्यप्राणी संरक्षण याविषयी बोलणं हे आज चलतं नाणं झालं आहे. पण २७ वर्षांपूर्वी जेव्हा हे विषय चर्चिलेही जात नव्हते, तेव्हा माझ्या या शाळेतील पाटील गुरुजींनी आमचे मराठीचे वर्ग फणसाच्या गर्द झाडावर चढून फांद्यांवर बसून चालवले होते. त्यांनी तिथे आम्हाला जंगलच्या गोष्टी, त्यांनी स्वतः केलेल्या शिकारीच्या गोष्टी, त्यावेळी अेक पाडस असलेली हरिणी हातून मारली गेल्याने त्यांना झालेल्या वेदना, त्या भरात बंदूक कायमची फेकून देअून रात्री झऱ्याकिनारी झाडपसर चढून त्यांनी घेतलेले विविध प्राण्यांचे दर्शन, त्यामुळे त्यांना प्रथमच निर्माण झालेली वन्य प्राण्यांविषयी आपुलकी, असल्या गोष्टी त्यांनी रंगवून सांगितल्या व कानात प्राण आणून त्यांच्यासोबत झाडावर बसून आम्ही त्या अैकल्या. जंगलाविषयी प्रेम व ओळख यातून निर्माण झाली. रसहीन धडे वाचणं किंवा प्राणी म्हणजे पशू अशी पाठांतरी करणं ही माझ्या मुलाची आजची मराठी शिक्षणाची अवस्था आहे. गडचिरोली सारख्या जंगलांच्या जिल्ह्यात राहूनही त्यांच्या शाळेचा व जंगलाचा दुरुनही संबंध नाही.

संतमेळावा

तुकारामाचे अभंग कडू औषध प्याल्याप्रमाणे पाठ करण्याची पाळी मराठी शिक्षणात आमच्यावर आली नाही. शाळेत आषाढी अेकादशीच्या वेळी  संतमेळावा  साजरा व्हायचा. वेगवेगळ्या संतांची भजने संगीतासह बसवणे, त्यांच्या जीवनावर नाटके बसवून सादर करणे, चित्र काढणे, लेख लिहून विद्यार्थ्यांचा हस्तलिखित अंक काढणे असल्या गोष्टीत पूर्ण शाळा पंधरा दिवस रमलेली असायची. तुकारामाचा  जे कां रंजले गांजले  हा अभंग तीन प्रकारच्या विविध चालींनी गायला मी या दरम्यान शिकलो व सोबतच भैरवी राग पण शिकलो. संतांचे काव्य, त्यांचा इतिहास, त्यांचे तत्वज्ञान हे सर्व  आम्ही खोलवर डुंबून शिकत होतो, फक्त शिकण्यावर भाषा, इतिहास, संगीत किंवा तत्वज्ञान असली विषयांची लेबले नव्हती.

पुढे काही वर्षांनी सरकारी शाळेत शिकायला गेलो असतांना  काव्य कुसुमांजली  नावाच्या कवितांच्या होल्डॉल सारख्या पुस्तकात अेक कविता  जे कां रंजले गांजले  ही देखील होती. तुकाराम महाराज स्वतःच तिथे रंजले गांजलेले वाटत होते.

असं शिकलो वनस्पतीशास्त्र

वनस्पतीशास्त्र हे बहुतेक शाळांमधे पुस्तकातील आकृत्या किंवा काचेच्या शिशीत ठेवलेले नमुने यांवरुन शिकवतात. मुळांचे प्रकार पानाचे प्रकार असली माहिती कटकटीच्या रुपात विद्यार्थी पाठ करतात व परीक्षेच्या दुसऱ्या दिवशी विसरुन जातात. नई तालीम विद्यालयात व भोवताली शेती व बगीच्यांमधे विविध प्रकारची झाडे होती. आमचे शिक्षक आम्हाला घेअून प्रथम नुसते या आसमंतात भटकायचे, दिसणाऱ्या झाडांची नावे सांगायचे व त्यांची पाने, फुले, फळे दाखवाचे. सोबत बोरं, आवळे, करवंद व कैऱ्या तोडून खाणे देखील सुरु असायचे. (असले सखाद्य वर्ग नंतर मी फक्त अमेरिकेत पाहिले, पण तिथे वर्गात बसून चॉकलेट व कोकाकोला हे पदार्थ खाणं चालायचं!) फळे खाता खाता बोर आणि आंबा ह्यांची फळे कशी सारखी आहेत व या ड्रूप नावाच्या फलप्रकाराची वैशिष्ट्ये काय हे देखील समजून व्हायचं! असल्या भटकण्यातून व निसर्ग-दर्शनातून वनस्पतीशास्त्राचे विविध बारकावे आम्ही शिकलो. बॉटनीची थिअरी सगुण रुपात आमच्या सर्व बाजूंना पसरली होती. ती बघायला आम्हाला आमच्या शिक्षकांनी शिकवलं. त्यामुळे  पामेट डायव्हर्जंट रेटिक्युलर  हा पानांच्या रेषांचा प्रकार केवळ अगडबंब नाव वाटायचा नाही, कारण सोबत डोळ्यासमोर स्वतःच्या घरामागच्या पपईचं पान अुभं राहायचं!

परीक्षा म्हणून आमच्या शिक्षकांनी आम्हाला (वर्ग ७ वा) विविध प्रकारच्या पाना, फुलांचे वैज्ञानिक अल्बम बनवायला सांगितले. पूर्ण आसमंत आम्ही छानून काढला. आज २५ वर्षानंतरही सेवाग्राम परिसरात  पामेट डायव्हर्जंट रेटिक्युलर  या प्रकारात मोडणाऱ्या पानांची विविध झाडे कुठे कुठे आहेत हे मी इथून बघू शकतो. पुढे कॉलेजमधे वनस्पतीशास्त्र शिकायला काही प्रयास करावे लागले नाही. या विषयात विद्यापीठात प्रथम आलो तेव्हा आमचे प्रोफेसर कौतुक करायला लागले तेव्हा मी मनात म्हटले,  सर, मी वनस्पतीशास्त्र कॉलेजमधे नाही शिकलो. सेवाग्रामच्या शाळेत ते जगलो!”

## जीवनाशी संबंध असलेले गणित

अेका हौदाला दोन तोट्या आहेत. अेकाने पाणी येते, दुसरीने गळून जाते तर किती वेळात हौद रिकामा होईल ? असल्या प्रकारची गणितं गणिताच्या पुस्तकात वाचतांना नेहमी प्रश्न पडतो की गणित शिकवण्याचा जीवनाशी संबंध जोडताच येणार नाही का ? शहाणा माणूस प्रत्येक जीवनात हा वेळेचा हिशेब करण्याअैवजी ती गळती तोटी बंद करील व प्रश्न सोडवील. नई तालीम विद्यालयात मी घन (व्याप) ची कल्पना व गणित कसं शिकलो याचं अुदाहरण देतो.

दररोज सकाळी ३ तास अुत्पादक काम हा तेथील शिक्षणाचा अविभाज्य भाग होतो. गांधीजींचा ब्रेड लेबर , स्वकष्टाची भाकरी, चा आग्रह तर त्यामागे होताच पण सोबतच शिक्षणातून समाजोपयोगी कौशल्य व विज्ञान-शिक्षण प्राप्त करणे ही विनोबांची दृष्टीही त्यामागे होती. याप्रमाणे मी काही दिवस गोशाळेत काम करण्यास जात होतो. नवी गोशाळा बांधणं सुरु होतं. माझ्या शिक्षकांनी मला जबाबदारी दिली की अेक गाय दररोज सरासरी किती बादल्या पाणी पिते हे मोजून गोशाळेतील गायींच्या पिण्याच्या पाण्याची अेकूण गरज व तेवढे पाणी मावू शकेल अशा टाक्याचे माप ठरवावे, त्या टाक्याच्या भिंतींना किती विटा लागतील याचा हिशोब करुन विटा विकत बोलवाव्या. हे गणित व काम मला आठवडाभर पुरलं. घनतेची कल्पना व विविध आकाराचे घनमाप कसे काढावे (बादली ही निमुळता दंडगोल, हौद हा घन तर त्यांच्या भिंती हे घनाच्या पृष्ठभागाचे क्षेत्रफळ) या गणिती पध्दती मी यातून शिकलो.

## स्वयंपाकातून शिक्षण

कामातून विज्ञान शिक्षणाचं दुसरं अुदाहरण म्हणजे आमची स्वयंपाकाची जबाबदारी. शाळेच्या रसोईघरात जवळपास १०० जणं जेवीत. स्वयंपाकाची जबाबदारी पाळीपाळीने ८ जणांच्या टोळीवर येई. या टोळीला स्वयंपाकासाठी प्रतिमाणसी किती रुपयांचे बजेट अुपलब्ध आहे हे सांगण्यात येई. आहारशास्त्राच्या दृष्टीने संतुलित, सर्वांना आवडणारे पण अुपलब्ध बजेटमधे बसणाऱ्या जेवणाची आठवड्याभराची योजना बनवतांना आमची धांदल उडे. बटाट्याची भाजी स्वस्त पडे पण त्यात आहाराचे तत्व कोणते हे पुस्तकात पाहिल्यावर फक्त स्टार्च आहे हे कळल्याने ती बाद होई. किमान आवश्यक तैल पदार्थ किती हे आय.सी.एम.आर.च्या पोषण विषयक तक्त्यांवरुन पाहून तेवढे तेल टाकले तर ते बजेटच्या बाहेर जाई. कुशल गृहिणीला अनुभवाने अुपलब्ध असलेले शहाणपण आम्हाला नसल्याने आहारशास्त्र व अर्थशास्त्राची सांगड घालून बनवलेली आमची जेवणाची योजना बरेचदा पुस्तकी होई. शिवाय डाळ शिजायला लागणारा वेळ व सरपणाचा हिशोब हमखास चुके. मग रात्रीच्या स्वयंपाकाची भांडी घासता घासता आज हरलेल्या लढाईचे जखमी सैनिक अुद्याच्या स्वयंपाकाची पुनर्आखणी करीत. यातून आहारशास्त्र, घरगुती अर्थशास्त्र व स्वयंपाक ही तीन शास्त्रे आम्ही शिकलो. कोथिंबीरीमधे १०६०० युनिट्स अ जीवनसत्व आहे हे आजही जे माझ्या लक्षात आहे ते पुणे मेडिकल कॉलेजमधे १० वर्षे शिकल्यामुळे नाही तर ८ वीत स्वयंपाक घरात या पध्दतीने काम केल्यामुळे आहे. शिवाय कुकरमधील अुष्णतेचे व वाफेचे पदार्थ विज्ञानही शाळेच्या स्वयंपाक घरातच शिकलो.

## शेतीचे प्रयोग

आम्हा प्रत्येक विद्यार्थ्याला शेतीचा अेक छोटासा तुकडा देण्यात आला होता. तिथे काय पेरायचे, मशागत कशी, खत केव्हा व कोणते ही सर्व जबाबदारी आमची. विहिरीचे पाणी आपआपल्या शेतीला देण्यासाठी मागणी फार, त्यामुळे बऱ्याच वेळा रात्री नंबर लागायचा. मध्यरात्री कोल्ह्यांना निरखीत आपल्या शेताला पाणी द्यायला विद्यार्थी जायचे. ही शेती करण्यासाठी अॅग्रॉनामी व हॉर्टिकल्चर शिकावी लागे. खत देण्याआधी खतांचे रसायनशास्त्र समजून घ्यावे लागे व एवढे करुनही बरेचदा शेवटी अनुभवी शेतकऱ्यांना मार्गदर्शनासाठी शरण जावे लागे. जपानहून भातशेतीची नवी पध्दत शिकून आलेले मुक्तेश्वरभाई, द्राक्षांच्या शेतीचा पहिला प्रयोग करणारे प्रेमभाई, इस्त्राइलहून म्हातारपणात भारतात येअून घोड्याने शेती नांगरणारे श्री. हलेवी ही माणसे आसपास प्रत्यक्ष शेतीचे प्रयोग करीत असत. अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे शेतीच्या अर्थशास्त्राचे नवेनवे प्रयोग सुचवीत असत. या वातावरणात शेती करता करता आम्ही काय शिकलो नाही ?

कुणाच्या शेतीत अधिक अुत्पादन होते याची आम्हा विद्यार्थ्यांत स्पर्धा असे. पीक वाढवण्यासाठी भरपूर खत म्हणजे बादल्यांनी गोमुत्र देअून मी वांग्याच्या शेतीत पावणेदोन किलोचे अेक वांगे काढले. पुढे वर्धेच्या बाजारात कुणीच ते अजस्त्र वांगे विकत घेईना ही गोष्ट अलाहिदा!

## सजीव शिक्षण

शरीरश्रम करण्यात विद्यार्थ्यांचा शालेय वेळ खर्ची पडल्याने नई तालीमचा विद्यार्थी ज्ञानात मागे पडतो असा अेक आरोप अनेक वेळा केल्या जाई. मद्रास प्रांतात बेसिक एज्युकेशन सुरु केले तेव्हा, आमच्या मुलांना शरीरश्रमात गुंतवून अभ्यासात मागे ठेवतात या गैरसमजापायी तत्कालीन मुख्यमंत्री राजाजींना राजीनामा द्यावा लागला. वस्तुस्थिती काय होती ?

सर्व आवश्यक - अनावश्यक माहितींची भेंडोळी विद्यार्थ्याच्या डोक्यात ठासून भरुन ठेवणे व परीक्षेच्या वेळी त्याने ती जादुगारासारखी पटापट बाहेर काढणे हा ज्ञानाचा अर्थ ज्यांच्या मनात आहे त्यांना कदाचित हा आरोप खरा वाटेल. सल्फ्युरिक अॅसिडच्या महोत्पादनाच्या चार पध्दतींची विस्तृत माहिती नसेल तर विद्यार्थी रसायनशास्त्रात कच्चा आहे असा निष्कर्ष ही मंडळी काढतील. नववीतील मुलाला या माहितीचा काय अुपयोग, याच्याशी त्यांना कर्तव्य नसते. पण जीवनाशी संबंधित शास्त्रात नई तालीमचा विद्यार्थी अधिक सखोल व कुशल असे. पण अितिहास, भूगोल, राजनीती, सामान्यज्ञान यांचे काय ?

भूगोल हा विषय या माझ्या जादुभऱ्या शाळेत मी कधीच औपचारिकरीत्या शिकलो नाही पण भारताच्या विविध भागांतून व विदेशांतून येणाऱ्या पाहुण्यांची त्यांच्या देशांविषयी भाषणे व विद्यार्थ्यांसोबत प्रश्नोत्तरी, देशोदेशींची तिकिटे गोळा करण्याचा छंद व त्यातून होणारी विविध देशांची माहिती, अवांतर वाचनात वाचलेली प्रवासवर्णने व कथाकादंबऱ्यात येणारी विविध देशांची पार्श्वभूमी, यातून मी भूगोल शिकलो. ९ वीत असतांना शरत्‌चंद्रांचे पथेर दावी आणि झवेरचंद्र मेघाणीचे प्रभू पधारे या कादंबऱ्यातून ब्रम्हदेशात घेअून जाण्याला कारणीभूत झाली. भूगोल हा सजीव विषय होता, बुध्दीवरचा भार नव्हता.

राजनीती व सामान्यज्ञान यासाठी आमचे शिक्षक फार वेगळा मार्ग वापरीत. दररोज संध्याकाळी ते आम्हा सर्वांना वर्तमानपत्रातील ठळक किंवा रंजक बातम्या वाचून दाखवीत व सोबत त्या घटनांमागचा इतिहास, राजकारण सांगीत. क्यूबाला रशियाने पाठवलेली अणुअस्त्रे व ती थांबवण्यासाठी अमेरिकेने केलेली कारवाई ही त्या काळातली अेक प्रमुख घटना होती. त्यावरुन दुसऱ्या महायुध्दानंतर जगाचे भांडवलशाही व साम्यवादी अशा दोन गटात झालेले विभाजन व त्याचा इतिहास, अमेरिका व रशिया यामधील वैमनस्याचे कारण, क्युबाच्या क्रांतीची माहिती सांगत. स्विट्झरलँड देशाचे लोक स्वतःच्या देशाला हेल्वेटिया का म्हणतात ह्या तिकिट संग्रहाच्या छंदामधून निघालेल्या प्रश्नामुळे त्या देशाचा आम्ही इतिहास शिकलो.

## अभिनव पध्दती

गांधींचा शिक्षणाविचार, रवींद्रनाथांचे कलाप्रेम व हे प्रत्यक्षात अुतरवण्यासाठी शाळेत वापरण्यात आलेल्या वेगवेगळ्या सृजनशील शैक्षणिक पध्दती यांची अशी अनेक अुदाहरणे देता येतील. परीक्षेत पेपर सोडवण्याव्यतिरिक्त प्रत्यक्ष शेती, स्वयंपाक करण्यापासून नाटक बसवून सादर करणे, भाषण देणे, लेख लिहिणे या विविध अंगांची परीक्षा व्हायची. सर्वात आगळा प्रयोग म्हणजे वर्ग ही कल्पना अत्यंत लवचिक करण्यात आली. प्रत्येक विद्यार्थी काही विषयात अधिक चांगला व कांही विषयात कमी चांगला असतो. त्याला सर्व विषयांसाठी एकाच वर्गात बसवण्याऐवजी प्रत्येक विषयातील त्याच्या पातळीनुसार त्या त्या विषयांसाठी वेगवेगळ्या वर्गात बसवण्यात आले. म्हणून मी एकाच वर्षी इंग्रजीत सातवी, गणितात नववी व मराठीत दहावीमध्ये होतो.

मूल्यशिक्षण हा या शिक्षणाचा अविभाज्य भाग होता. श्रमनिष्ठा, स्वावलंबन, समता, सामुहिकता या गोष्टी आम्ही शाळेत दररोज प्रत्यक्ष आचरणात आणून जीवनात जिरवत होतो. शिवाय या मूल्यांसाठी चालणाऱ्या समाज-परिवर्तनाच्या व्यापक चळवळीतही विद्यार्थ्यांचा सहभाग होता. दरवर्षी काही काळ पूर्ण शाळा बंद होअून भूदान चळवळीत भाग घ्यायला जायची.

## गिळंकृत झालेले बेट

माझ्या शाळेचे हे वर्णन आज सांगतो तेव्हा अनेकजण विचारतात, आता आहे का ती शाळा ? आम्ही आमच्या मुलांना पाठवू. हीच या शाळेची शेवटची गोष्ट सांगायची राहिली.

गांधीजींचे ग्रामोद्योग शासनाने अडगळीत टाकले व प्रस्थापित कारखान्यांच्या स्पर्धेत ते बाद झाले. या शाळेला शासकीय मान्यता नसल्याने ती देखील प्रस्थापित शिक्षण व्यवस्थेच्या स्पर्धेत टिकू शकली नाही. शासकीय मान्यता नसल्याने या शाळेतील विद्यार्थ्यांना पुढे शैक्षणिक भवितव्य नसे. निव्वळ या एका कारणाने पालक या शाळेत आपली मुले पाठवू इच्छित नसत. भूदान-ग्रामदान चळवळीतील अनेक कार्यकर्त्यांनी आपल्या मुलामुलींना या शिक्षणपध्दतीत पाठवले पण एका विशिष्ट काळानंतर परत काढून घेतले. समाज व शासन या शिक्षणाला मोजत नव्हते. हा न्यूनगंड येथील विद्यार्थ्यांनाही सतत खात होता. कोणत्याही परिवर्तनाचे बेट आजूबाजूच्या विरोधी वातावरणात फार काळ टिकून राहू शकत नाही. केळीवेळीचे

ग्रामदान कां टिकू शकले नाही ?  याच कारणांनी समाजाच्या स्वार्थाच्या व स्पर्धांच्या लाटांनी एक दिवस शिक्षणाचे हे अद्‌भुत बेट गिळून टाकले.

माझ्या मुलांना मी त्या बेटावर पाठवू इच्छितो. पण ते जादुभरे बेट आता कुठे आहे?

-----xxxxx-----